बैठकीचे इतिवृत्त  दिनांक /०८/२०२६

दिनांक /०८/२०२६ रोजी शासन परिपत्रक क्र डीपीपी २०१५ /प्रक्र /५०/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ नुसार पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) गुन्हे शाखा.गु.अ.वि. मुंबई यांच्या अध्यक्षते खाली गठीत समितीची नियोजीत बैठक अध्यक्षांच्या दालनात पार पडली.

<u>सदर बैठकीस खालील सदस्य हजर होते.</u>

१) श्री.मिलिंद काठे, पोलीस निरीक्षक, गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक, मुंबई........... सदस्य
२) श्री. जालींदर डोईफोडे, विधी अधिकारी , मुंबई....... सदस्य

शासन परिपत्रक क्र २०१५/प्र.क्र ५१/पोल १० दिनांक १७/१०/२०१५ मधील शासनाच्या सुचने प्रमाणे न्यायालयीन प्रकरणाचा निकाल तपासी यंत्रणा अथवा अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्या विरुध्द गेला असल्यास त्या संदर्भात दिनांक /०८/२०२६ रोजी दुपारी ०४.१५ वा. खालील गुन्हयातील आरोपी निर्दोष सुटल्याने बैठक आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये माहे एप्रिल २०२६ ते जून २०२६ या कालावधीतील आरोपी निर्दोष सुटलेल्या गुन्हयाचा आढावा घेण्यात आला.

सदर बाबत कक्ष १ ते ५, मालमत्ता कक्ष, खंडणी विरोधी पथक व गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक या कक्षांचा माहे एप्रिल २०२६ ते जून २०२६ या कालावधीतील अहवाल मागविण्यात आले होते. प्राप्त अहवाला मधील कक्ष-५, खंडणी विरोधी पथक यांनी पाठविलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासन परिपत्रकातील प्रपत्राप्रमाणे अहवाल सोबत जोडण्यात आला आहे.

सदर चर्चा करुन दुपारी ०४.३० वाजता बैठक संपविण्यात आली.

(जालींदर डोईफोडे)
विधी अधिकारी
गुन्हे शाखा, मुंबई

( मिलिंद काठे)
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा. मुंबई

( राज तिलक रौशन )
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा. मुंबई

( शासन परिपत्रक ,गृह विभाग, क्र डीपीपी-२०१५ /प्र.क्र ५१/पोल १०, दिनांक २६ फेब्रुवारी २०१९ सोबतचे प्रपत्र )

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण) गुन्हे शाखा, मुंबई

समितीच्या बैठकीचा दिनांक :- / /२०२६

## माहे एप्रिल -२०२६ ते जून २०२६ पर्यंतचा अहवाल

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण कमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कक्ष -५ | कोर्ट केस क्र. १९९/पीडब्ल्यु/ २०१० | वि.स्था.ख.क्र. १५/२००९ कलम ३,२५ भाहका. सह ३७(१)(अे) सह १३५ मपोका<br>दि. ०३/०४/२००९ | दोषारोप पत्र दाखल दि. २४/०२/२०१०<br>न्यायनिर्णय दि. ०५ /०६/२०२६ | १) पंच साक्षीदार रहमत नझीर शहा (PW ०३) याने साक्षीव्दारे पंचनाम्या अंतर्गत जप्त केलेल्या वस्तुंची ओळख पटवली परंतु आरोपीनां ओळखले नाही. (पंच साक्षीदार फितूर)<br>२) स्वतंत्र साक्षीदार असलेल्या पंच साक्षीदारास आरोपीची ओळख पटवता आली नाही. त्यामुळे साक्षीदाराच्या विश्वासार्हतेवर संशय निर्माण केला.<br>३) पंच साक्षीदारांच्या जबाबात व माहिती देणारा / फिर्यादी यांच्या जाबबात तफावत आहे. सदर विरोधाभासामुळे साक्षीदारांच्या विश्वासर्हतेवर शंका निर्माण<br>४) साक्षीदार क्र. – २ रमेश परमार यांनी उलटतपासणी मध्ये आरोपी क्र. ०१ ने आरोपी क्र. ०२ कडे दिलेल्या पॉलिथिनच्या पिशवीचा रंग आठवत नसल्याचे सांगीतले तसेच कोणत्या वस्तु दिल्या हे साक्षीमध्ये सांगीतले नाही.<br>५) पोलीस कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त अन्य कोणताही स्वतंत्र साक्षीदार आरोपीकडून अग्निशस्त्र व जिवंत काडतुसे जप्त करण्यात आल्याचे सांगत नाही.<br>६) आरोपी क्र. ०३ यांचा गुन्हयामध्ये सहभाग असल्याचा ठोस पुरावा नाही. | | | निरंक |

( जालींदर डोईफोडे )
विधी अधिकारी.
गुन्हे शाखा, मुंबई

( मिलिंद काठे )
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

(राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा, मुंबई.

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण कमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कक्ष -५ | कोर्ट केस क्र. १९९/पीडब्ल्यु/ २०१० | वि.स्था.ख.क्र. १५/२००९ कलम ३,२५ भाहका. सह ३७(१)(अे) सह १३५ मपोका दि. ०३/०४/२००९ | दोषारोप पत्र दाखल दि. २४/०२/२०१०<br><br>न्यायनिर्णय दि. ०५ /०६/२०२६ | ७) पंच साक्षीदारांना बोलावण्याबाबत फिर्यादी आणि तपासी अधिकारी यांचा साक्षी जबाबात तफावत आहे.<br>८) फिर्यादी यांनी साक्षी जबाबात सांगीतलेल्या काडतुसाचा क्रमांक आणि पंचनाम्यातील क्रमांक यामध्ये विसंगती आहे.<br>९) एकंदरीत आरोपीकडे आवश्यक परवान्याशिवाय अग्निशस्त्र होते हे सिध्द झाले नाही. | | | निरंक |
| २ | खं.वि.प. | स्पेशल केस क्र. २१७६/२०२३ | गु.प्र.शा. गु.र.क्र. ११७/२०१४ कलम ४८९(ब) ४८९(क), १२०(ब), सह ३४ भादवि सह १५ | दोषारोप पत्र दाखल दि. ११/१२/२०२३<br><br>न्यायनिर्णय दि. १२ /०५/२०२६ | १)सरकारी साक्षीदार (PW १,२ आणि ९ ) यांच्या व्यतीरिक्त कोणत्याही अन्य साक्षीदाराने आरोपींच्या ताब्यात बनावट नोटा असल्याची साक्ष दिली नाही.<br>२) आरोपींना पकडल्यानंतर पंच साक्षीदारांना बोलावण्यात आले त्यापुर्वी पंच साक्षीदार घटनास्थळी उपस्थित नव्हते. या बाबत तपासी अधिकारी यांनी कोणतेही कारण दिले नाही. सदर बाबत संशय निर्माण केला गेला.<br>३) पंच साक्षीदार नसरूददीन (PW - ०५ ) यांने उलट तपासणी मध्ये सांगीतले की, पंच साक्षीदार घटनास्थळी पोहोचण्यापुर्वीच दोन्ही आरोपींना पकडले होते.<br>४) “ सापळा पूर्व ” पंचनामा करण्यात आला नाही. त्यामुळे जप्तीच्या प्रक्रियेबाबत संशय निर्माण झाला.<br>५) घटनास्थळी हे गर्दीचे ठिकाण होते. तरीही गर्दीतील व्यक्ती स्वतंत्र साक्षीदार म्हणुन सरकारी पक्षाने सादर केले नाहीत.<br>६) घटनास्थळावरून CCTV फुटेज जप्त केले नाही.<br>७) पुरावा कायदा कलम २७ अंतर्गत जप्त करण्यात आलेल्या बनावट नोटा हया ग्राहय धरल्या नाहीत कारण घटनास्थळ हे बाथरूमचे छत हे सामायिक व सहज उपलब्ध ठिकाण होते.<br>८) त्यामुळे आरोपीने नोटा बाळगल्या हे सिध्द झाले नाही म्हणुन आरोपीची गुन्हयातुन निर्दोश मुक्तता करण्यात आली. | | | निरंक |

( जालींदर डीईफोडे )
विधी अधिकारी.
गुन्हे शाखा, मुंबई

( मिलिंद काठे )
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

(राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा, मुंबई.

| अ. क्र. | कक्ष | प्रकरण कमांक/ मा.न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरुप (गुन्हा नोंद कमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक व न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णया नुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांचे नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | खं.वि.प. | कोर्ट केस क्र. ४४५/पीडब्ल्यु/२०१२ | गु.प्र.शा. गु.र.क्र. ४५/२०१२ कलम ४६५, ४६८, ४६९, ४७१, ४२०, ३४ भादवि | दोषारोप पत्र दाखल दि. १६/०६/२०१२<br><br>न्यायनिर्णय दि. ०२ /०६/२०२६ | १) आरोपींनी ग्राहकांची बनावट कागद पत्रे तयार करुन त्याचा गैरवापर केला हे ठोस व विश्वासार्ह पुराव्याने सिध्द झाले नाही.<br>२) पंच साक्षीदार (PW ०३) यांनी जप्ती व पंचनाम्यातील वस्तु बाबत साक्ष दिली परंतू त्याला आरोपींची ओळख पटविता आली नाही.<br>३) कचरु झारेकर (PW ०१) यांच्या कागदपत्राचा वापर सिम कार्ड मिळवण्यासाठी आरोपींनी केला होता. मात्र त्यांनी त्यांच्या साक्षीमधून पुराव्याच्या अनुषंगाने कोणतीही माहिती दिली नाही त्यामुळे आरोपी विरुध्द ठोस दोषारोप सिध्द झाले नाही.<br>४) आरोपींनी Airtel कंपनीला फसवून किंवा चुकीची माहिती देवून सिम कार्ड मिळवली हे सिध्द झाले नाही.<br>५) PW - ०२ यांनी सिम कार्ड व कागदपत्रे जप्त झाल्याचे सांगीतले मात्र बनावट कागदपत्रे तयार करण्याच्या प्रत्यक्ष कृतीबाबत त्यांना ठोस पुरावा देता आला नाही. | | | निरंक |

( जालींदर डोईफोडे )
विधी अधिकारी.
गुन्हे शाखा, मुंबई

( मिलिंद काठे )
पोलीस निरीक्षक,
गुन्हेगारी गुप्तवार्ता पथक,
गुन्हे शाखा, मुंबई.

(राज तिलक रौशन)
पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण)
गुन्हे शाखा, मुंबई.